
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®



Editor
Dr.Bapu G.Gholap

Revised Edition.

MAH/MUL/ 03051/2012
ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

Jan. To March 2018
Issue-23, Vol-01

Editor
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) STRONGLY U FLAT MODULES OVER MATLIS DOMAIN || 61
Rajeev Kumar Sharma ,Dr. Rizwana Jamal, Dr.M.R.Aloney, Bhopal.

15) EFFECTIVENESS AND APPROACHES TO LABOUR WELFARE || 65
Prof. N.E.Bhangale, Bhusawal

16) POTENTIALITY OF ADVENTURE TOURISM IN NORTHERN ... || 68
Dr Bhanu Hazarika. Changsari.

17) Digital Information literacy among research scholars .... || 75
Debabrata Ray,Burdwan.

18) A study of Role Commitment among Elementary Teachers || 81
Dr. Sapna Sharma

19) ROLE OF MICRO FINANCE AND SELF HELP GROUP FOR ..... || 84
Ajaybhai Arvindbhai Talpada

20) CRYSTAL STRUCTURE AND DIELECTRICAL PROPERTIES .... || 91
R. G. Vidhate, Beed

21) स्वच्छ भारत अभियानाचा चिकित्सक अभ्यास...... || 94
डॉ.वायभासे शिवाजी विठ्ठलराव,कळमनुरी

22) बुलढार्णी जिल्ह्यातील गिंमर्णीव शहराची ऐतिहासिि पार्श्वभुमी || 100
Shailendra Chavan

23) भेदिक लावण्याचे स्वरुप-विशेष || 103
प्रा.डॉ. गजानन पां.जाधव, औरंगाबाद.

24) महात्मा फुलेंवरील पाश्चात्य विचारवंत व साहित्याचा प्रभाव || 105
प्रा.प्रदीप मोहन कांबळे,सांगली.

25) "उत्तम कांबळे" यांचे आत्मचरित्रात्मक लेखन- एक दृष्टिक्षेप || 108
प्रा.डॉ. गायकवाड यशवंत जंगलू, ता. भूम. जि. उस्मानाबाद

26) सत्यशोधक चळवळ आणि दीनमित्र || 111
कु.सारिका संतराम पाचरणे, अहमदनगर

27) मॉल संस्कृतीचा किरकोळ बाजारावर झालेला परिणाम विशेष संदर्भ पुणे शहर || 114
देशमुख रजणी अरुणराव

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

सुरू करण्याची व स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. पाश्चात्य तत्ववेत्त्यांच्या ज्ञान व आंदोलनाची चिकीत्सा करून त्यांनी महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचे प्रवाह बदलण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. महात्मा फुलेंनी आपले संपूर्ण आयुष्य शोषणरहित समाजनिर्मितीसाठी व्यतीत केले. त्यांच्या दृष्टीकोनामुळे महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेच्या पर्वास सुरवात झाली.

• **संदर्भ ग्रंथ**

१) कठारे अनिल, महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९ पृ.२९

२) पाटील पंढरीनाथ सीताराम, महात्मा जोतिराव फुले यांचे चरित्र, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०१२ पृ.२०

३) कित्ता, पृ.२१

४) कठारे अनिल, महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास, पृ.३०

५) फडके य.दी (संपा), महात्मा फुले समग्र वाङःमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१, पृ.७३६

६) नरके हरि, फडके य. दी.,महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहीला, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, १९९१ पृ.७३

७) फडके य.दी., महात्मा फुले समग्र वाङःमय, पृ.७४२

८) नरके हरी, फडके य.दी., महात्मा फुले गौरव ग्रंथ पृ.२०

९) कित्ता, पृ.२५३

१०) कित्ता, पृ.१०१

११) कित्ता, पृ.२५३

१२) फडके य.दी., महात्मा फुले समग्र वाङःमय, पृ.७३६

१३) नरके हरी, फडके य.दी., महात्मा फुले गौरव ग्रंथ पृ.५९

१४) कित्ता, पृ.७६

१५) कित्ता, पृ.८२

**25**

# "उत्तम कांबळे" यांचे आत्मचरित्रात्मक लेखन- एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. गायकवाड यशवंत जंगलू**
शंकरराव पाटील महाविद्यालय भूम, ता. भूम, जि. उस्मानाबाद

**प्रास्ताविक :**

उत्तम कांबळे यांचे जीवन आणि साहित्यलेखन यांचे नाते अतुट आहे. त्यांच्या साहित्यातून अवतीभवतीच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसते. त्यांना आलेले विविध अनुभव पाहिलेला समाज, वेगवेगळ्या साहित्य प्रकारात आविष्कार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लेखनात विविधता जाणवले.

उध्दव कानडे म्हणतात " श्री उत्तम कांबळे यांनी आयुष्य भर असे घणाचे घाव पचविले. म्हणूनच त्यांचे आयुष्य आज विचार धनाने समृध्द झालेलं पहायला मिळते" त्यांनी समाजा मधील अंधश्रध्दा, विविध प्रथा, भटक्यांचे जीवन, कैदाची प्रतिभा, अशा कितीतरी समाजातील दुर्लक्षित गोष्टीवर प्रकाश टाकला आहे आणि हेच त्यांच्या लेखनाचे विषय आहेत.

उत्तम कांबळे यांचे गाव टाकळीवाडी, कोल्हापूर जिल्ह्यातील आणि शिरोळ तालुकाच्या पूर्वकडील हजार ते दिड हजार लोकवस्तीचे गाव टाकळीतील प्रत्येक घरातील एक दोन तरी तरुण लष्करात आहेत. याच खेड्यात १९५६ च्या आसपास त्यांच्या जन्म झाला. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झालेल्या नंतरच्या वर्षात ते जन्माला आले. एवढेच त्यांच्या आईला माहित होते.

साठोत्तरी कालखंडात डॉ. आंबेडकरांच्या, वाणीतून व कृतीतून प्रेरणा घेऊन मराठी साहित्य क्षितिजावर दलित साहित्याच्या रुपाने निळी पहाट उद्याला आली. पिढ्यान पिढ्यांचे नरक प्राय जीवन, धर्म, वंश जातीमुळे लादलेले हिनत्व त्यांच्या जोडीला दारिद्रय आणि या सर्वाची परिणीती बकाळ जगण्यात होणे साहजिकच होते. पिण्याच्या पाण्यासाठी व मंदिर प्रवेशासाठी माणसांचे माणुसपणा नाकाराणाज्या धर्म संस्थे विरुध्द, जातिसंस्थे विरुध्द, दलित मने बंड करुन उठली. हजारो वर्ष वाचा बंद असणारा

मूकनायक मुक्तपणे बोलू लागला, शतकानु शतके मनी, बाळगलेले दु:ख करीत उज्वल उद्याची स्वप्न पाहू लागला. यासाठी मुख्यप्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ ठरली. त्यामुळे दलित साहित्य केवळ वाङ्‌मयीन चळवळ न राहता तिचा समाज परिवर्तनाच्या चळवळीशी घनिष्ट संबंध आहे. शिक्षणने आत्मभान आलेली नवी पिढी नव्या जाणिवेतून स्वत:कडे, समाजाकडे पाहू लागली.

उत्तम कांबळे हे चतुरस्त्र लेखक, हाडांचा कार्यकर्ता, उत्तम वक्ता आणि अभ्यासू संपादक अशी उत्तम कांबळे यांची विविध रुपे आहेत. साहित्य हे समाजाचा आरसा असते. समाजतीवनाचे प्रतिबिंब त्यामध्ये पडलेले असते. साहित्यिक आपल्या सुक्ष्म निरीक्षण शक्तीच्या सहाय्याने आपल्याला आलेले अनुभव साहित्यामध्ये मांडत असतो. त्याला जे भावले ते तो त्यांच्या पध्दतीने मांडत असतो. उत्तम कांबळे ही याला अपवाद नहीत. त्यांना समाजामध्ये जीवन जगत असतांना जे अनुभव आले ते त्यांनी आपल्या साहित्य कृतीमधून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

उत्तम कांबळे यांनी अनेक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. ठाणे येथे संपन्न झालेल्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष राहिलेले आहेत आणि सांगली येथे संपन्न झालेल्या ८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष ही राहिलेले आहे. या शिवाय त्यांना अनेक पुरस्कार लाभलेले आहेत. याशिवाय त्यांना पत्रकारितेसाठी २०१२ सालापर्यंत एकुण ५३ पुरस्कार मिळाले आहेत.

मराठी साहित्यामध्ये अल्पावधीतच मानाचे स्थान निर्माण करणारे लेखक म्हणून उत्तम कांबळे यांना ओळखले जाते. कथा, कादंबरी, कविता, आत्मकथपर लेखना बरोबर ललित व वैचारिक स्वरुपाचे विविधांगी साहित्य लेखन त्यांनी केले आहे. गेल्या दशकभरा पासून त्यांच्या साहित्य लेखनाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. उत्तम कांबळे यांच्या आत्मपर लेखनामध्ये एकुण चार पुस्तकांचा समावेश आहे. "वाट तुडवितांना" २००३ "आई समजुन घेताना" - २००६ एका स्वागताध्यक्षाची डायरी-२००८ आणि संमेलनाध्यक्षाची डायरी -२०११ ही त्यांची दोन प्रासंगिक स्वरुपाची आत्मपर पुस्तके आहेत. त्याच्या इतर लेखनाप्रमाणेच आत्मपर लेखनानेही आपल्या एक आगळा वेगळा ठसा उमटविला आहे. एखाद्या व्यक्तिचा जीवन वृत्तांत केवळ एखाद्या पुस्तकामध्येच शब्दबध्द न होता. तो आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर, आयुष्यात येणाऱ्या प्रतिष्ठा सन्मान व मानापमानाच्या प्रसंगावर आधारित विविध पुस्तकांच्या मालिकामधून शब्द बध्द करता येतो. हे उत्तम कांबळे यांनी आपला वरील पुस्तकामधून दाखवून दिले आहे.

१) "वाट तुडवितांना" या आत्मकथानामध्ये उत्तम कांबळे यांच्या जीवनातील १९९४ पर्यंतचा प्रवास अधोरेखित झाला आहे. जवळ जवळ ४० वर्षाचा हा कालखंड आहे. यामध्ये उत्तम कांबळे यांनी वाचन वेड्या "मी" ची धडपड व संघर्ष मय जीवन कहानी चित्रित केली आहे. "समाज" या वृतपत्र प्रेस मधील पडेल ती कामे करुन, सायकलवर फिरन वृत्तपत्र टाकण्यापासून ते सकाळ मधील संपादक पदापर्यंतची यशस्वी वाटचाल चित्रित झाली आहे. वडील मिलिटरीमध्ये असल्यामुळे लेखकाचे बापण आई बरोबर आजोळी जाते. तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होते. उत्तम कांबळे त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण खऱ्या अर्थाने तेथेच होते. घरामध्ये प्रचंड दारिद्रय व अज्ञान असतांनाही लेखकांने शिक्षण घ्यावे अशी त्यांची आई, वडील आणि अजा, आजीची इच्छा असते.

चौथीमध्ये गेल्यापासून लेखकाला वाचनाची आवड निर्माण होते. " जादूच्या राक्षस" हे पुस्तक खरेदी करण्यासाठी गावातील मेलेले रेडकू ओढून त्याचे चामडे काढण्याच्या प्रसंगापासून ते पुढे स्वत:च्या साहित्य निर्मितीच्या जोरांवर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होई पर्यंतचा प्रवास लेखकाने या आत्मकथनातून अधोरेखित केलेला आहे. या आत्मकथनातून उत्तम कांबळे प्रस्थपित समाज व्यवस्थेमुळे दलितांची झालेली परवड शोषिकता व्यक्त करु पाहतात. त्याच बरोबर उपेक्षित जीवन जगणाऱ्या माणसाचे वाचन-शिक्षणाच्या वेडातून झालेले जीवन परिवर्तनही व्यक्त करतात. अर्थात इथल्या समाज व्यवस्थेकडून आलेले समाजवास्तव या आत्मकथनाच्या केंद्रस्थानी आहे.

**वाट तुडवितांना मधील सामाजिक जाणिवा :-**

प्रस्थापित अमानवी व्यवस्था बदलायची असेल तर आपल्याला आणि आपल्या समाजाला अगोदर बदलावी लागेल. ही जाणिव यामध्ये प्रकर्षाने दिसून येते. दलित माणसाच्या जीवनात क्षणेक्षणी मानभंग-अपमान-अव्हेलना यांचे अनुभव येतात. त्यांच्या मुळाशी अज्ञान आहे. तसेच दलित माणूस करीत असलेली गावगाड्याची हिन दर्जाची हलकी कामे हे ही कारण आहेच. त्यामुळे अशी घाणीची कधी जीवघेणी ठरणारी कामे बंद केली पाहिजेत. ही जाणीव "वाट तुडवितांना" मधून व्यक्त होते. प्रस्थापित समाज व्यवस्थेकडून दलितावर अनेक जाचक प्रथा- परंपरा लाढल्या होत्या. ज्या परंपरेनी दलित माणूस म्हणून नाकारला होता. त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते. व्यवस्थेच्या या नकारालाच नकार देण्याची जाणीव यामधून व्यक्त होते.

अस्पश्य म्हणून समाज व्यवस्थेने नाकारलेल्या दलित

माणसाला निसर्गदत्त जे पिण्याचे पाणी तेही मिळू दिले नाही. जे पाणी पशु-पक्षी पिऊ शकतात. ते पाणी ही समाजव्यवस्था आम्हाला मिळवू देत नाही ही जाणीव ही "वाट तुडवितांना" मधून व्यक्त होते.

बहुतेक आत्मकथनातून भुकेच्या प्रश्नाला मध्यवर्ती स्थान मिळाले आहे. भूक शमविण्यासाठी लागणारी साधनेच समाज व्यवस्थेने हिरावून घेतली आहे. कष्टाची तयारी असतांना सतत कष्टाची कामे करत असतांनाही उपासमार चालूच आहे. याचे कारण कष्टाचा मोबदला मिळत नाही. ही जाणीव यातून व्यक्त होते. दलित जाणिवेमध्ये भाकरीपेक्षा प्रतिष्ठा, अर्थापेक्षा माणूसकीचे मुल्य महत्वाचे आहे.

"वाट तुडवितांना" यापुस्तकातून उत्तम कांबळे यांच्या विद्याजविनाची जडणघडण कळते. या विद्या जीवनामध्ये दोन गोष्टीचा समवेश होतो. एक औपचारिक शिक्षण आणि दुसरी म्हणजे ग्रंथप्रेम याचाच परिणाम ते पत्रकार, लेखक, संपादक, वक्ता, तत्वचिंतक, संघटक, कार्यकर्ता होण्यात झाली. घरी अठरा विश्वे दारिद्रय, गेल्या कित्येक पिढयात कोणीही शाळा शिकले नाही. अशा कुटूंबात कांबळे याचा जन्म झाला.

**२. "आई समजून घेतांना" :** उत्तम कांबळे यांच्या आत्मककथनपर लेखनामध्ये हे पुस्तक सर्वाधिक चर्चेत राहिलेले दिसते. सामान्यत: आत्मकथनपर लेखनामध्ये "स्व" जीवन व "स्व" विषयक जाणीवा आविष्कृत होतांना दिसतात. उत्तम कांबळे यांचे हे आत्मकथन मात्र त्यांस अपवाद आहे. या आत्मकथनाचा नायक "मी" नसुन त्यांची आई आहे. संबंध आत्मकथानामध्ये "मी" ची ओळख ही केवळ आई विषयक भाव-भावनामधूनच होते. स्वत:च्या जन्मदात्या आईला समजून घेण्याची धडपड करणारा एक नायक म्हणून त्यांचे अस्तित्व राहते. या आत्मकथनामध्ये लेखकांच्या आईची अनेक रुपये पाहायला मिळतात. देव, देवतांच्या नावाने उपास-तापास करणारी आई, हिंदू देव, देवतावर, श्रध्दा ठेवणारी तेच आपल्या नातवाबरोबर बुध्दांच्या मूर्तीसमोर उभी राहते. तेव्हा चेहऱ्यावर समाधानाचे भाव प्रकट करणारी आई अशी अनेक रुपये पाहायला मिळातात. शहरात लेखकाकडे राहायला आल्यानंतर मुलाच्या वैभवाच्या आनंदापेक्षा, गावाकडील मुलाच्या संसाराची व नातवाच्या शिक्षणाची चिंता करणारी ही आई आहे. रांख, ठोक व परखड स्वभावाची ही आई आपल्या शिकलेल्या प्रतिष्ठित मुलालाही वेळप्रसंगी जाब विचारतांना दिसते. जीवन जगण्याचे तिचे स्वत:चे एक तंत्र आहे. ती त्यापासून कधीच विचलित होत नाही.

उत्तम कांबळे यांच्या या आत्मकथनातील आईच्या पाचविला अठराविश्वे दारिद्रय पुजलेले आहे. अडचणीचे डोंगर ती उपसते आहे. अहोरात्र संसारासाठी कष्ट आणि कष्ट वेचणं हेच तिचे जीवन आहे आणि तरीही आपल्या परिस्थितीचे चटके आपल्या मुलाला बसू नयेत म्हणून ती त्याला शिकण्यासाठी शिकून शिकत मोठे होण्यासाठी धीर देत एक सारखी पुढे लोटत आहे. एका अर्थाने अशिक्षित असले तरी शिक्षणावर अलोट प्रेम करणार व शिकूनच माणूस मोठा होतो. यावर दृढ विश्वास व निष्ठा असलेलं झुंजार आणि बाहेरुन राकट पण अंतर्यमी कोमल व संवेदनशील असं हे व्यक्तिमत्व आहे. अशा आपल्या आईच्या व्यक्तिमत्वाच्या छटाचं चित्र कांबळे यांनी आपल्या आत्मकथनात रेखाटले आहे.

"आई समजून घेतांना" या आत्मचरित्रात्मक पुस्तकची गुलबर्गा विद्यापीठमध्ये एम.ए.च्या अभ्यासक्रमांसाठी निवड झाली. तसेच या पुस्ताचे ब्रेल-लिपीत कानडी भाषेत आणि इंग्रजीतही अनुवाद झाले कांबळेची आई राब-राब राबायची ही आई म्हणजे अक्का स्वत: अतिशय कष्ट घेत. मुलांच्या खर्चामुळे अस्वस्थ ही होते. अक्का लेखकाला वारंवार भूतकाळात नेते. एके ठिकाणी ती म्हणजे "तुझ्या लहानपणी आपण दोघं रोजगाराला गेलो आणि दिवसभर राबलो. तर फक्त चार-पाच रुपये मिळायचे. इथं तुझं परग मात्र दहा रुपयाच्या चॉकलेटचा एकच घास करतं तुला मागचं दिवस कसं आठवत नाहीत" आईने स्वत: खुप कष्टात दिवस काढले होते. दोन वेळचे जीवन हेच तिचे ध्येय होते. पण तरीही ती हे सारे करीत होती. लेखक आईने घेतलेल्या कष्ठाच्या कितीतरी आठवणी आढवत राहतो. हे पुस्तक वाचत असतांना "आई" ची खरी ओळख होते. आईच्या मनाचे अंत:करणाचे कितीतरी पदर उलगडले जातात. लेखकांला नेहमी भूतकाळात नेणारी आई दोन वेळची भाकरी मिळविण्यासाठी कसा संघर्ष करावा लागतला. हे पुन्हा पुन्हा सांगायची. लेकरांची हौस पुरी करावी असे ही तिला वाटायचे पैसे नसल्यामुळे डोक्याच्या केसांचा पुजका ती विकायची आणि मिळालेल्या पैशातून मुलांना मिठाई घ्यायची. आईला स्वत:ला टी.बी. झाल्याचे कळताच ती स्वत:हुन नातवंडापासून दूर राहते. अशा कितीतरी प्रसंगातून "आई" समजून येते. तिच्या व्यक्तिमत्वाच्या कितीतरी पैलूंचे दर्शन घडते.

उत्तम कांबळे यांच्या आईच्या व्यक्तिमत्वाचे कंगोरे रंगवितांना प्राचार्य सुनिलकुमार लवटे म्हणतात. "लेखकाची आई एक लढणारी, तरारी, स्वाभिमानी आई आहे. लेखक आपल्या आईची एक स्मरण साखळीच आपल्या पुढे उभा करतो. आपल्या मुलासाठी जीव-गहाण ठेवयाला तत्पर असलेली अशी आई रेखाटलेली आहे.

**३) एका स्वागताध्यक्षाची डायरी :-** एक उत्कृष्ठ रोजनिशी १४ ऑक्टोबर २००७ ते २४ जानेवारी २००८ या कालावधीत मनात उठलेले वैचारिक तरंग, वैचारिक वातावरणातील वावटळ "जसे



S.P. Mahavidyalaya BHOOM Tq. Bhoom Dist. O'bad
PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® | Oct. To Dec. 2018 Issue-23, Vol-01 | 0111

घडले तसे" शब्द बध्द केले आहे. त्याला ही साहित्यिक मुल्य प्राप्त होते. ते म्हणजे त्यातील कलात्मकतेमुळेच उत्तम कांबळे यांचे हे सर्व आत्मकथन वजा लेखन म्हणजे समाजोपयोगी दस्तऐवज ठरविण्याची कुवत त्यात आहे. पराभुत नायकाला किंवा अस्वस्थ नायकाल नायकाला किंवा अस्वस्थ नायकाला जगण्याची जिकण्याची प्रेरणा देणारे ज्वलंत विचार आहेत.

सांगलीच्या ८१ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी उत्तम कांबळे यांची निवड १४ ऑक्टोबर २००७ ते २४ जानेवारी २००८ या काळात संमेलना संबंधीत घडलेल्या घटनांच्या नोंदी, एका स्वागताध्यक्षाची डायरी मधून केल्या आहेत. कवी संमतलनातील निमंत्रीत कवी, त्यांच्या त्याच कविता अशा अनेक व्याक्तीच्या नोंदी वास्तव म्हणून या डयरीत आहेत. साहित्य संमेलना संबंधीचे मनोज्ञ दर्शन या डायरीतून स्पष्ट होते.

नाशिकहून सांगलीकडे आपल्या मूळ गावी जातांना त्यांच्या मनात जे वैचारिक तरंग उठले ते आणि सभोवतलाच्या एकुण वैचारिक वातावरणातील वावटळ शब्द बध्द करतांना त्यांनी जसे घडले तसे सादर केले आहे. पण सांगलीत नवी जबाबदारी पेलतांना ज्यांनी अप्रत्यक्ष अडवणुक केली. त्यांना विशेष न दुखवता उघड करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे साहित्य महामंडळाच्या मनमानी कारभाराची उदाहरणे दिली आहेत. एखाद्या संवेदशील माणसाला हे पद भूषवत असताना किती ओढताणीच्या माणसिक अवस्थेतून जावे लागते. याचेही चित्रण या पुस्तकात आले आहे. लेखकांनी जे पाहिले, दिसले आणि अनुभवले तेच लिहिल्यामुळे प्रामाणिक लेखन वाचल्याचा आनंद ही वाचकांना मिळतो. कांबळे यांचे आत्मचरित्रात्मक लेखन ही वाचकांच्या हृदयाला भिडणारे आहे. याची जाणीव होते. त्यांची भाषा शैलीही साधी, सोपी, आणि प्रभावी, आहे. वाचकांना गुंतवून ठेवल्याचे व विचार प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. बंधुता प्रतिष्ठाण पुणे, स्मरणिका, १९९८

२. निवडक उत्तम कांबळे- डॉ. प्रल्हाद लुलेकर, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती डिसेंबर २०१०.

३. वाट तुडवितांनाच्या शोधात- संपा. आयुतोष पाटील, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

४. आई समजून घेतांना- उत्तम कांबळे, लोक वाड्:मय गृह मुंबई.

५. महाराष्ट्र साहित्य पत्रिका,- संपा. डॉ. सु.प्र. कुलकर्णी ऑक्टोबर ते डिसेंबर २०१०

६. एका स्वागताध्यक्षाची डायरी - उत्तम कांबळे

**26**

# सत्यशोधक चळवळ आणि दीनमित्र

कु.सारिका संतराम पाचरणे
पीएच.डी.संशोधक विद्यार्थिनी
मु.पो.ता.शेवगाव (लक्ष्मीनगर)
जि.अहमदनगर

महात्मा फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सामाजिक न्याय मिळावा म्हणून त्यांनी नव्या सत्याची कास धरणाऱ्या समाजाची स्थापना करुन हाच खरा बहुजनांचा धर्म आहे. हे पटवून दिले. ईश्वर एक आहे त्याच्या प्रार्थनेसाठी कुण्या मध्यस्थाची, पुरोहिताची जरुरी नाही. प्रत्येकाने ईश्वराशी लीन होऊन सत्याने बोलावे, वागावे दीनदुबळ्यांना मदत करावी असे या सत्यधर्मात सांगितले आहे. या समाजात सर्व समान आहेत. स्त्रीला समान अधिकार आहेत. मानवी हक्काचे सर्वांना समान वाटप आहे. एक दुसऱ्यांना मदत केली पाहिजे अशी मानवतेची शिकवण या सत्यशोधक समाजात आहे.

महात्मा फुलेंनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज व नव्या परिवर्तनशील धर्माची तत्त्वे शेकडो सत्यशोधकांनी घराघरात पोहोचवलेली आढळून येतात. पुढे हा विचार तेवत ठेवण्यासाठी तिचे रुपांतर सत्यशोधक चळवळीत झाले. त्यासाठी वृत्तपत्रातून लेख लिहून जागृती केली, तर सत्यशोधक जलाशातून या नव्या सत्यशोधक समाजाचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यास मदत झाली.

सत्यशोधक विचार वृत्तपत्रांद्वारे, पुस्तकांद्वारे समाजात रुजविणारे म्हणून सत्यशोधक पत्रकार मुकुंदराव पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. १९१० मध्ये त्यांनी घ्दीनमित्रड धुरा सांभाळली. त्यांनी म.फुले, कृष्णराव भालेकर यांच्या विचारांचा वारसा पुढे चालविला. आपल्या घ्दीनमित्रड साप्ताहिकातून सत्यशोधक चळवळीला चालना दिली. शिक्षणाचे महत्व सांगून समाजातील ढोंगी नेत्यांवर, शेतकऱ्यांचे मजुरांचे शोषण करणाऱ्या सावकरांवर त्यांनी लेख, अग्रलेखातून हल्ला केला आहे.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी मराठी वृत्तपत्रे ही मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज आणि आणि शहरी जीवनापुरती मर्यादित होती.